REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १३ मार्च, १९४० अंक ११

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें संदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### जर्मन कोळसा

जर्मन कोळसा आतां आगगाड्यांतून स्वित्सरलंड मार्गानें जर्मनीकडे जाऊं लागला आहे. येतांना त्या आगगाड्या इटालियन शेताचा माल जर्मनींत आणतात.

### "क्वीन एलिझाबेथ"

८५ हजार टनांची "क्वीन एलिझाबेथ" ही ब्रिटिश आगबोट ॲटलँटिक महासागर ओलांडून न्यू यॉर्कच्या बंदरांत गेली आहे. हा तिचा प्रथम प्रवासच होय, परंतु त्यावेळीं तिच्यावर एकहि उतारू नव्हता.

### परराष्ट्रीय व्यापाराच्या आकड्यांची प्रसिद्धि बंद

ब्रिटिश हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकडे क्रमशः प्रसिद्ध होत असत, ते फेब्रुवारीपासून कांहीं काळपर्यंत प्रसिद्ध करण्याचें बंद केलें असल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे. शत्रुपक्षीयास त्याबाबत तपशीलवार माहिती मिळूं नये हा त्यांतील हेतु आहे. व्यापारी वर्गाच्या सोईसाठी महत्त्वाचे आकडे सारांशरूपानें प्रसिद्ध केले जातील.

### १० हजार वॅगन्स आणि २४० इंजनें

फ्रान्समध्यें ज्या ठिकाणीं ब्रिटिश फौजा ठेवण्यांत आलेल्या आहेत, तेथें उपयोगांत आणण्याकरितां, १० हजार माल वहातुकीच्या वॅगन्स आणि २४० इंजनें तयार करण्याचें काम ब्रिटिश कारखानदारांस मिळालें आहे.

### ग्रेट ब्रिटनमध्यें चहाचा खप

जगांत उत्पादन होणाऱ्या चहापैकीं निम्मा चहा एकट्या ग्रेटब्रिटनमध्यें खपतो. तेथील प्रत्येक मनुष्य दररोज सरासरीनें ५ पेले चहा पितो. म्हणजे, त्याची वर्षाची सरासरी १० पौंड झाली.

### सुवासिक वर्तमानपत्रें

कॉफी, अंगास लावण्याचा साबण, इत्यादि जिनसांची जाहिरात देण्याची एक नवीन टूम अमेरिकेंत निघाली आहे. ज्या वस्तूची जाहिरात द्यावयाची असेल, तिचा वास वर्तमानपत्राच्या छपाईच्या शाईंत मिसळला, म्हणजे वर्तमानपत्र उघडण्यापूर्वीच वासानें वातावरण दरवळून जातें आणि वस्तूस मुबलक प्रसिद्धि मिळते!

### बंदरांचें देणें कसें भागविणार?

सुमारें ४०० जर्मन आगबोटी परदेशांतील बंदरांतून पडून आहेत, त्यांचें बंदरांचें वार्षिक देणें ५ कोटि रुपयांपेक्षा अधिक होईल! हें वसूल करण्यासाठी आगबोटींचा लिलांव करावा लागेल आणि जर्मनी आपल्या आगबोटींस मुकून त्यांच्या किंमतीची रकमहि तिचे हातीं लागणार नाहीं.

### मुंबई प्रांतांतील जमीनमहसुलाची वसुली

१९३८-३९मध्यें मुंबई प्रांतांत जमीन महसुलाचे ३,९१,९७,००० रुपये वसूल व्हावयाचे होते, त्यापैकी ३,९०,०२,००० रुपये वसूल झाले. म्हणजे, ९९·५% वसुली झाली. वसुलासाठी लँड रेव्हेन्यू कोडाच्या १५२ व्या कलमानुसार १७,२९१ नोटिसा काढाव्या लागून १,१५० जमिनी सरकारजमा कराव्या लागल्या.

### भाज्यांची आयात

ग्रेट ब्रिटनमध्यें दर साल २० लक्ष हंड्रेडवेट टोमॅटो, २० लक्ष हंड्रेडवेट बटाटे, ४५ लक्ष हंड्रेडवेट कांदे, इत्यादि भाज्यांची आयात होते.

### बॉंबचा वेग

बॉंब कोणत्याहि आकाराचा असला, तरी तो तितक्याच वेगानें खालीं येतो, आणि खालीं येतांना त्याची गति वाढत जाते. विमानांतून पडतांना पहिल्या सेकंदास त्याची गति १६ फूट असली, तर १०. सेकंदांत ती दसपट होते. म्हणजे, १६०० फुटांवरून जाणाऱ्या विमानांतून बॉंब पडतांना दिसला तर त्यापासून बचाव करण्यास पृथ्वीवरील लोकांस १० सेकंदें मिळतील.

### युद्ध केव्हां संपेल!

ब्रिटिश इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनिअन नांवाची ग्रेट ब्रिटनमधील लोकांचीं मतें अजमावण्याचें काम करणारी एक संस्था आहे, तिनें जमा केलेल्या माहितीवरून खालील अनुमान निघतें. ग्रेट ब्रिटनमधील शेकडा ३० लोकांच्या मतें युद्ध एक वर्षाचे आंत संपेल, शेकडा४२लोकांच्या मतें तें संपण्यास १ ते ३ वर्षें लागतील, शेकडा ११ लोकांच्या मतें तें ३ वर्षांचे आंत संपणार नाहीं. स्त्रियांचेपेक्षा पुरुषांना युद्ध अधिक लांबेल, असें वाटतें आणि तरुणांपेक्षा वृद्धांस तें लवकर संपण्याची आशा आहे.

### अहमदनगर येथील स्थानबद्ध विदेशीय

अहमदनगर येथें स्थानबद्ध केलेल्या विदेशीयांपैकी आतांपर्यंत ५३० लोकांची मुक्तता करण्यांत आली आहे. त्यांपैकी ३२७ जेसुइट आणि १२३ मिशनरी आहेत. २८७ लोकांची मुक्तता करण्याचें नाकारण्यांत आलें आहे. ५८लोकांसंबंधीं अद्याप चौकशी चालू आहे.

### बर्लिनमधील एक संभाषण

प्रश्नः—"जर्मनी आणि हिंदुस्थान ह्यांत फरक काय?"

उत्तरः—"हिंदुस्थानांत, सर्व लोकांचेसाठी एक मनुष्य उपास करतो. जर्मनींत, एकाचेसाठी सर्वांस उपोषण करावें लागतें."

### लंडनचा नंबर खालीं गेला

चालू युद्धामुळें लंडन शहरांतील बरीच वस्ती उठून गेली आहे, त्या कारणानें नेहेमीच्या ८२ लक्ष लोकवस्तीपैकी ३० लक्ष लोकसंख्या कमी झाली आहे. लंडन आतां जगांतील सर्वांत मोठें शहर राहिलेलें नाहीं. न्यू यॉर्कची लोकसंख्या ६९¾ लक्ष आणि टोकियोची लोकसंख्या ६८¾ लक्ष आहे.

### सैनिकांचा भत्ता

युरोपांतील लष्करांपैकी ब्रिटिश सैनिकांस सर्वांत अधिक भत्ता मिळतो आणि बेल्जिअन सैनिकास कमी मिळतो.

### रोजी ७५ हजार टन पाणी

ग्रेट ब्रिटनमधील सर्व लोकांस मिळून दररोज ७५ टन पाणी पिण्यासाठी लागतें.

### वार्धक्याचें पेन्शन

ग्रेट ब्रिटनमधील १८ लक्ष, ४४ हजार लोकांस वार्धक्याबद्दल पेन्शन मिळतें. ह्या पेन्शनरांपैकी १० लक्ष, ८० हजार स्त्रिया आहेत.

### १० लक्ष लष्करी बुटांची मागणी

हिंदुस्थानांत १० लक्ष लष्करी बुट करून घेण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास ब्रिटिश सरकारकडून लिहून आलें असल्याचें समजतें. ह्या बुटांची किंमत २ कोटि रुपयांहून अधिक भरेल.

### ट्रंक टेलिफोन

कोल्हापूर येथील टेलिफोन एक्सचेंज हिंदी ट्रंक टेलिफोनला जोडण्यांत आला आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १२२ | कॅश सर्टिफिकिटें व सेव्हिंग बँक ठेवी–मध्यवर्ती बजेटावर चर्चा–सर जरेमी रेसमन सांचें उत्तर. | |
| २ जर्मन कोळसा, इटली व इंग्लंड ... | १२३ | ६ हिंदी कोळशाचें उत्पादन | १२५ |
| ३ ब्रिटिश बँकांतील व्यवहाराची वेळ ... | १२३ | ७ वर्तमान पत्राचें कार्य कोणतें ! ... | १२७ |
| ४ ब्रिटिश बँका आणि युद्ध परिस्थिती ... | १२४ | ८ हुंडणावळीचे दर ... | १२८ |
| ५ स्फुट-विचार ... | १२५ | ९ कपाशीचें उत्पादन... | १२८ |
| मुंबईच्या गिरण्यांतला संप-मुदती हुंड्यांवरील व्यूटी कमी झाली–ट्रेझरी बिलें, | | १० ऊंसाचें पीक ... | १२९ |
| | | ११ औंध स्टेट बँ. ॲन्ड इं. कं. | १३० |
| | | १२ निवडक बाजारभाव | १३० |



# अर्थ

बुधवार, ता. १३ मार्च १९४०


## जर्मन कोळसा, इटली व इंग्लंड

तटस्थ राष्ट्रांची गैरसोय न होण्याचा शक्य तितका प्रयत्न करून जर्मनीचा समुद्रावरील व्यापार बंद पाडावयाचा हें ब्रिटिश धोरण त्या राष्ट्रांस जाचक होत असलें तरीं त्यास बरेंच यश आलें आहे. प्रस्तुत युद्ध जिंकण्याचें दोस्त राष्ट्रांचें एक प्रबळ साधन म्हटलें म्हणजे जर्मनीचा बाहेरील देशांशीं होणारा व्यवहार संपुष्टांत आणणें हा होय. ब्रिटिश आरमाराचें समुद्रावरील वर्चस्व ह्या कामीं चांगलें उपयोगी पडत असून जर्मनीचें त्याच्यापुढें कांहीं चालत नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. जर्मनीस शांततेच्या काळांत पुरवला जाणारा आणि ह्या देशाकडून घेतला जाणारा माल तटस्थ राष्ट्रांस ब्रिटिश आरमाराच्या अनुमतीवांचून नेतां-आणतां येत नाहीं. ह्यासंबंधांत आपलें होणारें नुकसान तटस्थ राष्ट्रांनीं इंग्लंडकडून भरून मागावें अशी त्यांची उठावणी करण्याचा जर्मनीचा प्रयत्न आहे आणि त्यांचीं जहाजें बुडवण्याचा जर्मनीनें सपाटा चालवला आहे तो त्या राष्ट्रांस चिथावणी देण्याच्या हेतूनेंच होय. निर्गत व्यापाराचें महत्त्व जर्मनीस आयात व्यापाराच्या दृष्टीनेंहि आहे आणि तो व्यापार बंद करून जर्मनीस हतबल करणें हा इंग्लंडचा उघड उघड उद्देश आहे. जर्मन दगडी कोळशानें भरलेलीं जहाजें समुद्रावरून इटालियन बंदरांकडे जात असतां त्यांस ब्रिटिश आरमारानें आडवल्याच्या बातम्या नुकत्याच आल्या असून त्यासंबंधांत इंग्लंडनें इटलीस रोकठोक उत्तर दिल्याचेंहि प्रसिद्ध झालें आहे. इटली हें तटस्थ राष्ट्र आहे आणि त्यास कोळशाची आवश्यकता आहे; पण जर्मनीचा कोळसा इटलींत जाऊं देणें म्हणजे जर्मनीस युद्धसहाय्य मिळवूं देणें होय. इटलीची कोळशाची गरज अन्य रीतीनें भागवतां येणें शक्य असून जर्मन कोळसाच त्या राष्ट्रानें घेतला पाहिजे असें नाहीं हा मुद्दा पुढें मांडण्यांत आला आहे. प्रस्तुत प्रश्नाच्या दृष्टीनें इटलीस भासत असलेली दगडी कोळशाची जरूर आणि त्याचा पुरवठा होण्याचे मार्ग ह्यांविषयींची माहिती देणें उपयुक्त आहे.

इटलींत अलीकडे उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें होत आली असून पाण्याच्या जोरावर विजेचा पुरवठा होण्याची तजवीज करण्यांत आलेली असली तरीं कोळशाची वाण कारखान्यांत भासल्यावांचून रहात नाहीं. इटलींत कोळसा मुळीच निघत नाहीं, असें नाहीं. पण त्याचा पुरवठा गरजेच्या मानानें फारच थोडा म्हणजे आठवा हिस्सा आहे. इटलीचा कोळसा हलक्या दर्जाचा आहे ही आणखी एक अडचण आहे. ह्यामुळें इटलीस कोळशासाठी परदेशांवर अवलंबून रहावें लागतें आणि प्रतिवर्षी सरासरीनें सव्वा कोटि टन कोळसा बाहेरून आयात करावा लागतो. प्रस्तुत युद्धापूर्वी ह्या आयातीपैकी निम्मी जर्मनी व ऑस्ट्रिया ह्या देशांतून होत असे आणि इंग्लंडमधून सुमारें एक पंचमांश पुरवठा केला जाई. अबिसिनियन युद्धाच्या काळापासून इटली पुष्कळच कोळसा जर्मनीकडून घेत आहे. जर्मनीस स्वतःच्या उपयोगाकरतां अधिक कोळसा लागत आहे ही गोष्ट बाजूस ठेवली तरी जर्मन माल इटलीस न्यावयाचा कसा हा अवघड प्रश्न आज उपस्थित झाला आहे. आगगाडीच्या मार्गानें जर्मनीमधून कोळसा थोडाच येऊं शकेल आणि युद्ध परिस्थितींत हा पुरवठा देखील मर्यादितच होणार. समुद्राचा मार्ग एका बाजूनें बंद पडला आणि दुसऱ्या बाजनें रेल्वेचा रस्ता उपलब्ध नाहीं. अशी परिस्थिति इटलीच्या कोळशाच्या पुरवठ्याबाबत झाली आहे. जर्मन कोळशाची जागा इंग्लंडनें भरून काढण्यांत इटलीची व ब्रिटनचीहि सोय आहे. इटलीस बाहेरून आणावा लागणारा कोळसा स्वतः किंवा इतर राष्ट्रांच्या सहायानें पुरवण्याची व्यवस्था इंग्लंडलाच करावी लागेल. इटलीशीं सख्य कायम राखणें व जर्मन व्यापाराची नाकेबंदी करणें हा दुहेरी उद्देश ह्या रीतीनें साध्य होण्यासारखा आहे. तटस्थ राष्ट्रांस इंग्लंडच्या विरुद्ध उठवण्याचा जर्मनीचा डाव प्रस्तुत बाबतींत इंग्लंड कांहीं झालें तरी चालू देणार नाहीं आणि इटलीसहि ब्रिटिश धोरणास अखेर मान्यता द्यावीच लागेल. जर्मन व्यापाराची नाकेबंदी तटस्थ राष्ट्रांस व्हावयाच्या मालाच्या मामुली पुरवठ्याच्या मार्गांत येऊं दिली जाणार नाहीं असें आश्वासन इंग्लंडनें त्यांस दिलें आहे. त्यास अनुसरून दगडी कोळशाबाबत तडजोडीची कांहीं व्यवस्था इटलीस पत्करावी लागेल.

## ब्रिटिश बँकांतील व्यवहाराची वेळ

युद्धास प्रारंभ झाल्यानंतर ग्रेटब्रिटनमधील बँकांनीं आपल्या कामाचे तास कमी करून ते चारावर आणले, त्यामुळें व्यापारी वर्गाची बरीच गैरसोय होऊं लागली. बँकांचें काम आतां कमी झालेलें नसून तें उलट वाढलेलेंच आहे. बँकांच्या कामाचे तास वाढविले, तर काम त्या दिवसाचें त्या दिवशीं पुरें होणें अशक्यप्राय होईल आणि आज ज्या कार्यक्षमतेनें त्या काम उरकूं शकतात, ती कार्यक्षमता रहाणार नाहीं, असें बँकांचें म्हणणें आहे. युद्धपरिस्थितीमुळें बँकांस कित्येक नोंदी दोन, दोन ठिकाणीं करून ठेवाव्या लागतात आणि पूर्वी जें काम सहज होऊं शके, तें टपालानें करावें लागतें. बँकांच्या कामाचे तास कमी झाले, तरी त्यांतील कारकुनांस घरीं जाण्यास पूर्वी इतकाच उशीर होतो आणि कांहीं नोकर लष्करांत दाखल होत असल्यामुळें उरलेल्या नोकरवर्गावर कामाचा अधिकच ताण पडतो. कित्येक कामें नवशिक्या नोकरांकडून करवून घेणें बँकांस भाग पडतें.

## ब्रिटिश बँका आणि युद्धपरिस्थिति

### वार्षिक सभांतील भाषणें.

(१)

लॉइड्स बँक लि. चे अध्यक्ष, लॉर्ड वॉर्डिंग्टन, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"१९१४ ते १९१९ ह्या मुदतींत ग्रेट ब्रिटनमधील प्रमुख बँकांच्या ठेवी तिपटीनें वाढल्या आणि त्यांचे प्रसिद्ध केलेल्या नफ्याचे आकडेहि दुपटीहून अधिक झाले. सरकारनें मोठ्या प्रमाणावर लोकांकडून कर्ज काढलं आणि त्यांतून खर्च केला, तो पैसा बँकांकडे ठेवींच्या रूपानें आला, आणि त्यांनीं त्याचे सरकारी रोखे घेतले. झालेल्या नफ्याचा विनियोग डिव्हिडंड वाटण्याकडे न करतां त्यांतून बँकांचे फंड वाढविण्यांत आले. बँकिंग संस्था बळकट करणें हें भागीदारांच्या, बँकांच्या, देशाच्या, सर्वांच्याच हिताचें आहे. चालू युद्धामुळें निर्माण होत असलेली परिस्थिति गेल्या महायुद्धाचे वेळच्या परिस्थितीपेक्षा भिन्न दिसते. आतां ठेवींत थोडीफार वाढ झाली आहे, परंतु त्यांचा किफायतशीर उपयोग करण्याचें साधन राहिलेलें नाहीं. बँक रेट खाली आहे, गुंतविलेल्या रकमांवर तेवढेंहि व्याज पडण्याची मारामार आहे, खर्चाचें प्रमाण अधिक आहे, १९१४ चे मानानें आज आपल्या कर्जाचें ठेवींशीं प्रमाण अल्प आहे, परंतु गुंतविलेल्या रकमांवर अधिक प्रमाणांत घसाऱ्याची तरतूद करणें मात्र आवश्यक आहे. कांहीं मर्यादित प्रमाणांत तरी आपणांस नफा मिळविणें आवश्यक आहे. जास्त नफा मिळविला, तर त्याचा मोठा भाग जादा नफ्यावरील कराचे स्वरूपांत सरकाराकडे जाईल ··· आपणांस लागणारें अन्न आणि युद्ध चालविण्यास आवश्यक असलेली सामुग्री हीं परदेशांत गुंतविलेलें भांडवल, आपला सुवर्ण संचय आणि निर्गत व्यापार ह्यांच्या विनिमयांत मिळावयाची आहे. मुख्य भर निर्गत व्यापारावरच आपणांस दिला पाहिजे. जर्मनीचा निर्गत व्यापार आतां थांबला असल्याकारणानें नवीन बाजारपेठा काबीज करण्यास सध्याची वेळ चांगली आहे.... शांततेच्या काळीं मिळणाऱ्या सुखसोयी युद्धकालांतहि मागण्याचा कोणास अधिकार आहे काय? करवाढ, जिनसांची योग्य प्रमाणांत वाटणी, कांहीं अंशीं रोख आणि कांहीं अंशीं कर्ज सर्टिफिकेटांचे स्वरूपांत मजुरीची वाटणी आणि ज्या वस्तू घेतल्यामुळें हुंडणावळीस ताण पडेल अशा वस्तू न घेण्याचा गिऱ्हाइकांचा निर्धार, ह्या मार्गांनीं किंमतींचें नियंत्रण होऊं शकेल. विशेषतः शेवटचा उपाय सर्वसाधारण नागरिकाचे आटोक्यांतील आहे. आपल्या बँकेचे १३ हजार नोकर आहेत, त्यांस महागाईमुळें ताण बसत आहेच. परंतु, पगार आणि राहणीचें मान ह्यांचा संबंध सध्याच्या सारख्या परिस्थितींत जोडण्यामुळें होणारा परिणाम ते जाणतात, हें मला ठाऊक आहे....फ्रान्स आणि ग्रेटब्रिटन ह्यांचेमधील आर्थिक सहकार्याचें बीज पुढें चांगलें उगवून त्यांतून युरोपांत कायम शांतता नांदण्यास लागणारें फळ निर्माण होईल अशी आशा आहे."

(२)

मिडलंड बँकेचे अध्यक्ष, राइट ऑनरेबल जॉन मॅकना आपल्या भाषणांत म्हणाले:—

"बँकांनीं आपला कारभार कार्यक्षमतेनें चालविला म्हणजे उद्योगधंदे सुरळीत चालण्यास सहाय होऊन युद्ध यशस्वी करण्यास सरकारास सहाय मिळेल. मालाची युद्धविषयक मागणी प्रथम पुरविली पाहिजे आणि पुरवठा पुरेसा पडला नाहीं तर महागाईमुळें आपोआपच तें कार्य साधतें. युद्धपरिस्थितीमध्यें लोकांना आपल्या क्रयशक्तीचा मोठा भाग सरकारचे स्वाधीन करावा लागतो. करवाढ होते आणि कर्जउभारणीहि केली जाते. लोकांस बचत करण्याचा आणि युद्धकर्ज घेण्याचा उपदेश आणि आग्रह करण्यांत येतो. युद्धविषयक कर्जें वगळून बाकीच्या कर्जांवर नियंत्रण चालण्याचें काम बँका करूं शकतात आणि त्यामुळें सरकारास आणि सरकारी कंत्राटदारांस त्या कर्जें अधिक मोठ्या प्रमाणावर देऊं शकतात. करवाढ आणि कर्ज उभारणी एवढ्यानेंहि भागलें नाहीं तर सरकारास बँक ऑफ इंग्लंडकडून आणि जॉइंट स्टॉक बँकांकडून कर्जें घ्यावीं लागतील आणि त्याचा परिणाम चलनांत भरमसाट वाढ होण्यांत आणि किंमती चढण्यांत होईल, परंतु व्यवस्थित रीतीनें योग्य मर्यादेंत सर्व गोष्टी केल्यास अशी भरमसाट वाढ होण्याचा संभव उरणार नाहीं. युद्ध बरेंच लांबल्यास लोकांच्या सर्व जादा मिळकतीची त्यांस सक्तीनें बचत करण्यास लावून ती क्रयशक्ति सरकाराचे ताब्यांत द्यावी लागेल ···आपल्या बँकेचे पुरुष नोकरवर्गापैकीं एकअष्टमांश लोकांनीं म्हणजे सुमारें १,४०० लोकांनीं लष्करांत नांव दाखल केलें आहे आणि आणखीहि लोकांस जावें लागण्याचा संभव आहे. बँकेच्या फ्लाइंग क्लबांतून २५० वैमानिक तयार होऊन ते आज सरकारास सहाय करीत आहेत. आपल्या बँकेच्या नोकरांपैकीं अनेकजण आपल्या फावल्या वेळांत राष्ट्रकार्य करीत आहेत...१९४० हें वर्ष कठीण जाईल ह्यांत संशय नाहीं. आवश्यक त्या जिनसा स्वदेशांत तयार करण्याचें अगर परदेशांतूनच विकत आणण्याचें आपलें सामर्थ्य मोठें असल्याकारणानें कोणतेंहि युद्ध जिंकणें आपणांस अवघड जाणार नाहीं. ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स ह्यांचें सहकार्य आर्थिक आणि लष्करी, दोन्ही बाबतींत प्रभावी झालें आहे. आपला आत्मविश्वास दांडगा असल्याकारणानें खोट्या प्रचाराची आवश्यकता ग्रेटब्रिटनमध्यें भासत नाहीं."

(३)

वेस्टमिन्स्टर बँकेचे अध्यक्ष, डॉ. रूपर्ट ई. बेकेट हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"आर्थिक संघटनेवर सरकारचा पूर्णपणें ताबा असला, म्हणजे पैशाचा विनियोग एकाद्या पक्षाच्या विशिष्ट धोरणानें कसा केला जातो आणि व्यापार, उद्योगधंदे व खासगी व्यक्ती ह्यांच्या हितसंबंधांकडे कसें दुर्लक्ष केलें जातें, ह्याचें उदाहरण जर्मनीमध्यें उत्कृष्टपणें दिसून येतें. प्रत्येक व्यवहार कसास लावून करण्याची ग्रेट ब्रिटनमधील बँकांची पद्धति आहे. एकाद्या पक्षाला उचलून धरण्याचा त्यांत संबंध येत नाहीं. तसेंच, बँकांतील जनतेच्या ठेवी त्यांच्याच रहातात, एकाद्या हुकूमशहाचे हुकुमानें त्या सरकारांत जप्त होत नाहींत...युद्ध चालू असेपर्यंत सरकारी खर्च मोठ्या प्रमाणावर चालणार हें उघड आहे. ह्याचा अर्थ, बरीच मोठी रकम कामगारांना मजुरीचे स्वरूपांत मिळणार. काटकसर करण्याचा आणि सरकारी कर्जांत पैसे गुंतविण्याचा उपदेश कामगारांनीं आचरणांत आणला नाहीं, तर मिळकतीपैकी मोठी रकम बँकांकडे ठेवीचे स्वरूपांत येईल. परंतु, गेल्या युद्धाचे वेळीं जितक्या प्रमाणांत ठेवी वाढल्या, तेवढ्या आतां वाढणार नाहींत......ज्या देशांशीं युद्धाचे पूर्वी आपणांस व्यापाराची संधि मिळाली नसती, त्या देशाशीं व्यापार आतां सुरू झाला आहे. परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधांमुळें निर्गतीस अडचणी येत असल्याची कित्येक व्यापाऱ्यांची तक्रार आहे, ती लवकर दूर होईल आणि नियंत्रणाची संवय झाली म्हणजे त्यांची अडचण वाटणार नाहीं, असा भरंवसा आहे. गेल्या महायुद्धाचे प्रारंभीं ग्रेट ब्रिटनमधील बँकांची संख्या आतांपेक्षा अधिक होती, त्यांस जर युद्धाचा ताण सहन करतां आला, तर आजच्या अधिक बलवत्तर आणि तत्पर बँकांस तो सहज सहन करतां येईल, हें उघड आहे. लोकांचा बँकांवरील विश्वास अढळ आहे."

# स्फुट विचार

## मुंबईच्या गिरण्यांतला संप

युद्धामुळें कामकरी वर्गाच्या रोजच्या जीवनास लागणारे जिन्नस महाग झाले आणि त्यांची ठराविक मजुरी अपुरी पडूं लागली. अशा स्थितींत महागाईच्या मानानें मजुरींत वाढ व्हावी अशी मागणी मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांतील कामकऱ्यांच्या वतीनें करण्यांत आली. पगारवाढ इत्यादि बाबतींत कारखानदार व कामकरी ह्यांचेमध्यें वांधे उपस्थित होतात, त्या प्रसंगीं दोन्ही पक्ष शक्य तितकी आपली बाजू ताणीत असतात असा अनुभव आहे आणि तें स्वाभाविकहि आहे. आपला धंदा चांगल्या स्थितींत नाहीं आणि युद्धामुळें आपणांस कांहींच फायदा झाला नसल्यानें महागाईसाठी पगारवाढ कामकऱ्यांच्या मागणीप्रमाणें करणें अशक्य आहे असें गिरणीमालकांचें म्हणणें होतें. ह्याच्या उलट, कामकरी लोकांचें मोठ्या प्रमाणांत महागाई मिळावी असें म्हणणें होतें. गिरण्यांतील मजूरांचे पगार असे कांहीं मोठे नसतात कीं, महागाई झाली असतां त्यांतून जादा खर्च भागवतां यावा. त्याचप्रमाणें कामकरी लोक हे कांहीं कच्चा माल किंवा यंत्रें नाहींत आणि त्यांच्या कामाची किंमत, मागणी—पुरवठ्याच्या नियमाप्रमाणें तंतोतंतपणानें करणें गैर आहे, ह्यासाठीच मजुरांस न्याय मिळावा आणि मालक व कामगार ह्यांचे तंटे तडजोडीनें मिटावे अशी व्यवस्था समाजाचे म्हणजे सरकारचे मार्फत करण्यांत येते. बरेच दिवस घासाघिस होऊन अहमदाबाद येथील तंटा सामोपचारानें निकालाच्या मार्गास लागला. मुंबईत मात्र गिरणीमालक कामकऱ्यांची मागणी वाजवीपेक्षा अधिक आहे. ह्या मुद्यावर ती मान्य करण्यास तयार झाले नाहींत आणि तडजोडीचे प्रयत्न निष्फळ होऊन कामगारांनीं कापडाच्या बहुतेक सर्व गिरण्यांत संप पुकारला. ह्या रीतीनें मुंबईतल्या कापडाच्या गिरण्या बंद पडण्याची पाळी यावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अहमदाबाद येथें जी गोष्ट शक्य होते, ती मुंबईस कां होऊं नये आणि तेथें मालक-मजूरांचा तंटा विकोपास कां जावा ह्याचें कारण शोधून काढणें आवश्यक आहे. समजुतीचा प्रयत्न पुन्हा होऊन त्यास लवकर यश येईल अशी आम्हांला आशा आहे.

---

## मुदती हुंड्यांवरील स्टँपड्यूटी कमी झाली

दुसऱ्याकडून विशिष्ट अवधीनंतर मिळावयाच्या पैशावरचा हक्क दर्शविणारी " मुदती हुंडी "सारखी सोइस्कर पत-पत्रिका नाहीं. व्यापाऱ्यानें दुसऱ्यावर काढलेल्या मुदतीच्या हुंडीचे पैसे ती बँकेकडून डिस्कौंट करून मुदत भरण्यापूर्वींच त्यास उभे करतां येतात. बँकेसहि आपला पैसा व्याजानें गुंतविण्याचा हा मार्ग सुरक्षित व फायदेशिर असतो. इंग्लंडमध्यें असल्या "ट्रेड" बिलांचा व्यवहार मोठ्या प्रमाणांत चालतो आणि तीं बिलें बँक ऑफ इंग्लंडकडून पुन्हां बँकांस डिस्कौंट करून घेतां येतात. मध्यवर्ती बँकेस पत व चलन ह्यांचें नियमन करण्यास ह्या बिलांचें चांगलें साधन मिळतें. हिंदुस्थानांत व्यापारी व्यवहारांमध्यें ट्रेड बिलांचा म्हणजे मुदती हुंड्यांचा फैलाव झाला तर हिंदी बँकिंगच्या उत्कर्षास सहाय होईल असा अभिप्राय बँकिंग इनक्वायरी कमिट्यांनीं दहा वर्षांमागें व्यक्त केला होता. रिझर्व्ह बँकेची स्थापना झाल्यापासून ह्या अभिप्रायास विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. परंतु ह्या हुंड्यांचा फैलाव होण्याच्या मार्गांत त्यांवरील स्टँप ड्यूटीची अडचण असल्याचें सरकारच्या निदर्शनास आणण्यांत आलें होतें. तथापि स्टँप ड्यूटी कमी करण्याविषयींच्या शिफारसीकडे सरकारनें योग्य लक्ष दिलें नाहीं. आतां इष्ट ती सुधारणा अंमलांत आली असल्याचें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. दर हजार रुपये किंवा कमी इतक्या रकमेच्या एक वर्षाच्या आंतील मुदतीच्या हुंडीवर दोन आणे स्टँप ड्यूटी ह्यापुढें घेण्यांत येणार आहे. ह्याच्या पूर्वींचे दर भारी होते. बाराशे रुपये पर्यंतच्या हुंड्यांवर दर दोनशे रुपयांस तीन आणे इतकी ड्यूटी ह्यापूर्वी द्यावी लागत असे. ह्याचा परिणाम असा होत असे कीं, कित्येक हुंड्यांवर शेकडा १८ ते ३६ पै इतका कराचा बोजा पडत असे. ह्यामुळें व्यापाऱ्यांची प्रवृत्ति हुंड्यांचा उपयोग करण्याऐवजी बिनमुदतीच्या वचन चिठ्यांच्या तारणावर कर्जें काढण्याकडे असे. बँक रेट ३ टक्के असतांना हें व्यापारी धोरण अगदी स्वाभाविक होतें. बँकांस आतां आपल्या गिऱ्हाइकांस मुदती हुंड्यांवर पैसे घेण्यास उत्तेजन देतां येईल आणि ह्या हुंड्या रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून घेण्याची त्यांची सोय होईल. अल्प मुदतींत व अपेक्षेप्रमाणें आपला कर्जाऊ दिलेला पैसा त्यांस ह्या रीतीनें योग्य प्रसंगीं तरता करणें शक्य होईल. देशांत खेळणाऱ्या पैशाचें नियंत्रण करणें ह्या मार्गानें रिझर्व्ह बँकेस सोपें जाईल हाहि एक येथें फायदा आहे. स्टँप ड्यूटीचा कायदा हिंदुस्थान सरकारच्या कक्षेंत येतो तरी तिचें उत्पन्न प्रांतिक सरकारचें आहे. ह्या सरकारांनीं वरील सुधारणेस संमति दिली आहे. स्टँप ड्यूटी कमी केल्यानें होणारें नुकसान मुदती हुंड्यांचा उपयोग अधिक प्रमाणावर झाल्यास भरून निघण्यासारखें आहे. हिंदी बँकिंगच्या वाढीस सहाय केल्याचें त्यांस श्रेय मिळेल तेंहि विचारांत घेण्यासारखें आहे.

---

## ट्रेझरी बिलें, कॅश सर्टिफिकिटें व सेव्हिंग बँक ठेवी

चालू खर्च व मामुली उत्पन्न ह्यांमध्यें पडणारें अंतर वेळच्या-वेळीं तोडण्यासाठी सरकारास अल्प मुदतीचीं कर्जें लोकांकडून घ्यावीं लागतात आणि त्यांचा मुख्य मार्ग म्हटला म्हणजे ट्रेझरी बिलांचा होय. जरूरीप्रमाणें बिलें विकणें आणि त्यांची मुदत भरली म्हणजे त्यांच्या पैशाची फेड करणें असा सरकारचा व्यवहार सारखा चाललेला असतो. सरकारला कमी व्याजानें तात्पुरतीं कर्जें मिळतात आणि बँकांस अल्प मुदतीपुरता आपला पैसा गुंतविण्याची सोय होते, :ही ट्रेझरी बिलांची दुहेरी सोय आहे. चालू वर्षाचे अखेरीस ट्रेझरी बिलांची द्यावयाची रक्कम ६ कोटि रुपयांनीं घटेल असा हिंदुस्थान सरकारचा अंदाज होता परंतु युद्धार्थीत्यर्थ पैशाचा जादा वटवडा झाल्याकारणानें ट्रेझरी बिलांचें देणें कमी होण्याच्या ऐवजी एक कोटि रुपयांनीं वाढलें आणि वर्षअखेर त्याची एकूण रक्कम ४७ कोटि रुपये होईल असा अंदाज आहे. सरकारी चांदीच्या विक्रीचे ११ कोटि रुपये हातीं आले नसते तर ही रकम अधिक मोठी झाली असती. हिंदुस्थान सरकारचा रिझर्व्ह बँकेशी करार आहे, त्यास अनुसरून चालू वर्षअखेर बँकेनें ५ कोटि रुपयांचें नाणें परत केलें तर तें त्यास स्वीकारलें पाहिजे. ही एकच बाब हिशेबांत धरून पुढील वर्षअखेर ट्रेझरी बिलांचें देणें ८ कोटि रुपयांनीं कमी होईल अशी फडनवीसांची अपेक्षा आहे. आर्थिक मंदीमुळें रुपयाचें नाणें गेलीं कांहीं वर्षें व्यवहारांत कमी प्रमाणांत खेळत आलें आहे पण युद्ध परिस्थिती-

मुळें नाण्यांस वाढती मागणी उत्पन्न झाली असून फेब्रुआरीच्या पहिल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेच्या चलनविभागांत सप्टेंबरच्या प्रारंभाचे मानानें १७ कोटि रुपयांचें नाणें घटलेलें होतें. ह्यामुळें रिझर्व्ह बँक हें नाणें सरकारकडे वर म्हटल्याप्रमाणें परत करील असें दिसत नाहीं. सप्टेंबरांत युद्ध चालू झाल्यावर कांहीं काळपर्यंत कॅश सर्टिफिकिटांची रोकड घेण्याची आणि सेव्हिंग्ज बँकांतून पैसे काढून घेण्याची थोडी प्रवृत्ति लोकांत दिसून आली. ह्या कारणानें चालू वर्षअखेर ५० लक्ष रुपयांनीं सर्टिफिकिटांच्या रकमेंत घट होईल असें वाटत होतें. त्याच्या ऐवजीं २½ कोटि रुपयांनीं ती रकम कमी होईल असा अंदाज आहे. येत्या वर्षाचे अखेरीस कॅश सर्टिफिकिटांची रकम १½ कोटींनीं कमी होईल आणि सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी २ कोटि रुपयांनीं वाढतील अशी अपेक्षा आहे.

---

### मध्यवर्ती बजेटावर असेंब्लींत चर्चा

मध्यवर्ती बजेटावर असेंब्लीमध्यें सर्वसाधारण चर्चा ता. ६ मार्च रोजीं झाली. ह्या चर्चेसाठीं दरसाल दोन दिवस राखून ठेवण्यांत येत असत, परंतु चालू बैठकीस निम्म्यापेक्षा अधिक लोकनियुक्त सभासद गैरहजर असल्याकारणानें, हजर असणारांस चर्चेसाठीं ह्या एका दिवसांतच नेहमीपेक्षां अधिक वेळ मिळेल, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. युरोपियन गटाचे प्रतिनिधि, मि. एकमन, ह्यांनीं प्रथम भाषण करून चालू वर्षाच्या सरकारी हिशेबांत वाढावा उरण्याजोगी हिंदुस्थान सरकारची चांगली परिस्थिति असल्याबद्दल समाधान व्यक्त केलें. युद्धविषयक हिंदी खर्चाचा केवढा वांटा ब्रिटिश सरकारनें उचलावा, ह्यासंबंधीं फडनवीसांनीं ब्रिटिश सरकारशीं वाटाघाट करून तयार केलेली योजना हिंदुस्थानाचे फायद्याची कशी आहे हें सांगून त्यांनीं त्याबाबत फडनवीसांचें अभिनंदन केलें. हिंदी साखरेच्या धंद्यावर कर बसविण्याचे संबंधांत मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकार ह्यांचेमध्यें अधिक सहकार्य असणें आवश्यक आहे, असें त्यांनीं सुचविलें व नवीन करांचें त्यांनीं स्वागत केलें. ह्या उलट, श्री. ए. सी. दत्त ह्यांनीं बजेटावर कडक टीका केली आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांवर कर लादून युद्धविषयक मोठ्या खर्चाच्या बजेटाची तोंडमिळवणी करणें इष्ट नाहीं, असें सांगितलें. उत्पन्नाचा अंदाज मुद्दाम कमी करून, वास्तविक वाढाव्याचें असलेलें बजेट तुटीचें दाखविण्यांत आलें आहे, अशी त्यांनीं तक्रार केली. पेट्रोलवरील करास सर यामिनखान ह्यांनीं विरोध दर्शविला.

---

### सर जरेमी रेसमन ह्यांचें चर्चेस उत्तर

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांनीं चर्चेत उपस्थित झालेल्या प्रश्नांस उत्तर देण्याचा प्रयत्न केला. माजी फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनीं असेंब्लींतील सभासदांची एक स्टँडिंग फिनॅन्स कमिटी अगर एस्टिमेटस कमिटी नेमण्यास मान्यता दिली होती, ती अद्याप नेमण्यांत आलेली नाहीं. गेलीं दोन–तीन वर्षें असेंब्लीची स्टँडिंग फिनॅन्स कमिटी अस्तित्वांत नाहीं. वरील दोहोंपैकीं कोणत्याहि प्रकारची कमिटी नेमण्यास आपली हरकत नसल्याचें फडनविसांनीं सांगितलें. युद्धविषयक खर्च कर्ज न काढतां भागवतां येत असेल तर तो तसा कां भागवूं नये असा त्यांनीं प्रश्न विचारला. खर्च आणखी वाढल्यास कर्ज काढावें लागेल, असें ते म्हणाले. उत्पन्न अंदाजांपेक्षा अधिक होईल, असें म्हणणारांची खर्च अंदाजाबाहेर जाणार नाहीं ह्याची हमी घेण्याची तयारी आहे काय? असा त्यांनीं सवाल केला, तेव्हां "बजेटाचें स्वरूप आतां उघड झालें" असें श्री. अणे उद्गारले. ह्याचा अर्थ, वाढत्या खर्चाची तरतूद उत्पन्न कमी गृहीत धरून फडनवीसांनीं करून ठेवली आहे, असा होतो.

---


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

( स्थापना : मे १९१६ )

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. | ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल | ....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. | ...... | २,९८,०००।– |
| इतर फंड्स्. | ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) | ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

• पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के. व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

कि. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

### हिंदी कोळशाचें उत्पादन

हिंदुस्थानांत १९३८ सालीं २ कोटि, ८३ लक्ष टन दगडी कोळशाचें, म्हणजे १९३७ च्या मानानें १३·२% अधिक उत्पादन झालें. विशेषतः, बिहारमधील झरिया येथील खाणींतून आणि बंगालमधील राणीगंज येथील खाणींतून कोळशाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर झालें. उत्पादनाचें दर माणशीं प्रमाण खालील-प्रमाणें पडतें:—

| देश | कोळशाचें उत्पादन. दर माणशीं प्रमाण (टन) |
|---|---|
| अमेरिका | ७६१ |
| जर्मनी | ३८३ |
| ग्रेटब्रिटन | २८७ |
| जपान | २०७ |
| हिंदुस्थान | १२५ |

१९३८ चे प्रारंभीचे महिन्यांत कोळशास किंमत चांगली आली, परंतु पुढें माल वहाण्यास रेल्वेच्या वॅगन्स मिळण्यास अडचण भासूं लागल्या कारणानें किंमती घसरल्या आणि कमी प्रतीचा कोळसा काढणाऱ्या खाणींस आपला माल विकणें कठीण जाऊं लागलें. १९३८ च्या उत्पादनाची, खाणींच्या तोंडाशीं, एकूण किंमत १० कोटि, ६४ लक्ष रुपये भरली; १९३७ सालीं ती ७ कोटि, ८१ टन भरली होती.

१९३८ मध्यें हिंदुस्थानांत एकूण २ कोटि, ७० लक्ष टन कोळसा खपला. म्हणजे, दर माणशीं वार्षिक खपाचें प्रमाण १·४ हंड्रेडवेट पडलें, ग्रेटब्रिटनमध्यें तें दर माणशीं ३·७९ टन आहे. २० हंड्रेडवेट म्हणजे एक टन होतो. १९३८ मधील हिंदी उत्पादनापैकी ३०·३% कोळसा हिंदी रेल्वेजनीं घेतला. लोखंडाचे आणि पोलादाचे कारखाने व इंजिनिअरिंग वर्कशॉप्स ह्यांनीं २१·८१% कोळशाची उचल केली. १९२८ सालानंतर १९३८ साला-इतका नफा कोणत्याहि इतर वर्षी कोळशाच्या खाणींस झालेला आढळत नाहीं.

---

### वर्तमानपत्राचें कार्य कोणतें ?

" वर्तमानपत्राचें मूळ काम बातमी देणें हें होय. त्या बातमीवर मतप्रदर्शन करणें हें त्याचें दुय्यम काम आहे. वर्तमानपत्रांवरील नियंत्रणाचा विचार करतांना सरकारी नियंत्रण प्रथम ध्यानांत येतें. हें नियंत्रण प्रत्येक देशांत कमी-अधिक प्रमाणांत आढळतेंच. एकाद्या विशिष्ट पक्षाच्या प्रचारासाठीं वर्तमानपत्रांचा उपयोग करण्यासाठी त्यांवर नियंत्रण ठेवणें वेगळें. आपल्या वर्तमानपत्राचा खप वाढावा ह्यासाठी त्यांचे मालक वर्तमानपत्राचें धोरण विशिष्ट रीतीनें आखतात आणि त्यामुळें त्याचें स्वातंत्र्य नाहींसें होतें. बातमी उकरून काढणें, मिळालेल्या बातमीस तिखट-मीठ लावणें, इत्यादि गोष्टी त्यास कराव्या लागतात आणि आपल्या वाचकांस खूष ठेवावें लागतें.

"गेल्या अर्ध शतकांतील सर्वांत सुप्रसिद्ध संपादक म्हणजे मँचेस्टर गार्डियनचे संपादक मि. सी. पी. स्कॉट, हे होत. ते आपणांस पटेल, तेंच लिहीत, त्यामुळें वाचकांचा त्यांचे शब्दावर विश्वास होता. स्वतःच्या पक्षामध्यें ज्यास एकहि दोष कधी दिसूं शकत नाहीं, त्याचे शब्दास महत्त्व कमी मिळालें तर त्यांत नवल कोणतें ? ":—

मि. पीटर ब्राउन ह्यांचें कलकत्ता येथील रेडिओवर झालेलें भाषण.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक— दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९१A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## हुंडणावळीचे दर

१ पौंडास किती परराष्ट्रीय चलन मिळतें ?

| | १९३१ पूर्वी | जानेवारी, १९४० |
|---|---|---|
| पॅरिस ( फ्रँक ) | १२४.२१ | १७६.५० |
| ब्रुसेल्स ( बेल्गा ) | ३५.०० | २३.८७½ |
| मिलन ( लिरा ) | ९२.४६ | ७८.०० |
| झूरिच ( फ्रँक ) | २५.२२½ | १७.८७½ |
| माद्रिद ( पेस्टा ) | २५.२०½ | ३८½ |
| ॲम्स्टरडॅम ( फ्लॉरिन ) | १२.१०७ | ७.५२ |
| स्टॉकहोम ( क्रोनर ) | १८.१५९ | १६.९० |
| ऑस्लो ( क्रोनर ) | १८.१५९ | १७.५० |
| कोपनहॅगेन ( क्रोनर ) | १८.१५९ | २०.४२¾ |
| बर्लिन ( मार्क ) | २०.४३ | चालू नाहीं |
| न्यू यॉर्क ( डॉलर ) | ४.८६⅔ | ४.०२ |

वरील तक्त्यांत ब्रिटिश पौंडाचें अन्य राष्ट्रांच्या चलनांशीं असलेलें प्रमाण दिलेलें आहे. हुंडणावळीच्या दराची मांडणी दुसऱ्या तऱ्हेनेंहि कांहीं देशांचे बाबतींत केली जाते. परराष्ट्रीय चलनाच्या मोबदला स्वतःचें राष्ट्रीय चलन किती द्यावें लागेल अथवा मिळेल अगर परदेशी चलनाच्या एक किंवा शंभर घटकांस स्वदेशांत राष्ट्रीय चलन किती मिळेल अथवा द्यावें लागेल, ह्या हिशेबानेंहि हुंडणावळ सांगतां येते. खालील तक्त्यांतील हुंडणावळीची पद्धत वरील खुलाशानें लक्षांत येईलः—

| | १९३१ पूवा | जानेवारी १९४० |
|---|---|---|
| ब्यूनॉस एरिस (एका पिसोला पेन्स) | ४७.६२ | १७.७५ |
| रिओडी जानेरो(एका मिलरीजला पेन्स) | ५.८९९९ | ३¾ |
| मॉंटी व्हिडो (एका पिसोला पेन्स) | ५१ | २२ |
| व्हालपॅरिसो (एका पौंडास पिसो) | ४० | ११० |
| मुंबई (रुपयास पौंड) | १ शि. ६ पे. | १ शि. ६ पे. |
| हॉंगकॉंग (डॉलरला पौंड) | ...... | १ शि. २$\frac{3}{16}$ पे. |
| शांघाई (डॉलरला पौंड) | ...... | ० ४$\frac{11}{16}$ पे. |
| कोबे (येनला पौंड) | २ शि. ०$\frac{7}{32}$ पे. | १ शि. २$\frac{1}{2}$ पे. |
| सिंगापूर (डॉलरला पौंड) | २ शि. ४ पे. | २ शि. ४$\frac{3}{16}$ पे. |

## कपाशीचें जागतिक उत्पादन

(१९३८-३९)

( ५०० पौंडांच्या गाठींचे हजारांचे आकडे )

| | |
|---|---|
| अमेरिका | १२,४४३ |
| ब्राझील | १,८७७ |
| हिंदुस्थान ( ४०० पौंडांच्या गाठी ) | ५,१२० |
| चीन | २,२०० |
| रशिया | ३,८५१ |
| इजिप्त | १,६९८ |
| जागतिक एकूण उत्पादन | ३१,११५ |
| अमेरिका वगळून जागतिक उत्पादन | १७,६७२ |
| अमेरिकेंतील उत्पादनाचें जागतिक उत्पादनाशीं प्रमाण | ५६.८% |


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१३,००,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंगी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यावर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल......रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ......रु. | ३,०६,१५० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | १,५२,९७५ |

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे. व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. डी. व्ही. रानडे. श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेफ्डिपॉझिट व्हाल्ट्स वगैरे चेक काढता येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. मोरावले. मॅनेजर.

## हिंदुस्थानांतील उसाचें पीक

**( सन १९३९-४० चा अंदाज )**

सुमारें ३६ लक्ष, १८ हजार एकरांत ऊस लावण्यांत आला आहे, असा अंदाज आहे. खालील तक्त्यांत त्याचा तपशील दिला आहे:—

| प्रांत | क्षेत्र, हजार एकर | | उत्पादन, हजार टन | |
|---|---|---|---|---|
| | १९३९-४० | १९३८-३९ | १९३९-४० | १९३८-३९ |
| संयुक्त प्रांत | १,९१४ | १,६५२ | २,१७७ | १,४५४ |
| पंजाब | ४१४ | ३५४ | ३०४ | २२९ |
| बिहार | ४४१ | ३७५ | ४६० | ३६९ |
| बंगाल | ३१६ | २९९ | ५२६ | ४३९ |
| मुंबई | १२९ | ११४ | ३२६ | २७४ |
| मद्रास | १३२ | ९८ | ३५८ | २७४ |
| सरहद्द प्रांत | ७१ | ५१ | ७९ | ५७ |
| आसाम | ३८ | ३८ | ४१ | ३८ |
| ओरिसा | ३३ | ३२ | ६५ | ६२ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | ३० | २९ | ४५ | ४५ |
| सिंध | ७ | ७ | १४ | १४ |
| दिल्ली | १ | १ | ३ | ५ |
| हैद्राबाद | ३६ | २९ | ७५ | ६४ |
| म्हैसूर | ४९ | ४५ | ६४ | ५८ |
| भोपाळ | ५ | ४ | ६ | ४ |
| बडोदें | २ | २ | ६ | ७ |
| एकूण | ३,६१८ | ३,११० | ४,५४७ | ३,३८८ |

## साखरेची आयात

गेल्या तीन वर्षांत आणि १९३८ आणि १९३९ च्या प्रत्येकीं नऊ महिन्यांत हिंदुस्थानामध्यें साखरेची आयात किती झाली, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| कोठून आली | १९३६-३७ | १९३७-३८ | १९३८-३९ | १९३८-३९ ९ महिने | १९३९-४० ९ महिने |
|---|---|---|---|---|---|
| | टन | टन | टन | टन | टन |
| ग्रेटब्रिटन | २८१ | २७० | ४,२११ | १५६ | १३,४८५ |
| जावा | १५०२२ | १०२९३ | २४५१० | ४,२०६ | २३०,५१४ |
| नेदरलंड्स | १,६४९ | ७८५ | १,३५० | ७५० | १,७०० |
| बेल्जम | ४५ | ४३ | ३८ | २९ | ... |
| स्ट्रे. सेटलमेंटस | १२७ | १ | २ | ... | १९१ |
| चीन | १,९०७ | ३९७ | ४१ | ३८ | १९ |
| हाँगकाँग | ३,१०३ | १,९१९ | २,५५१ | १,९३६ | १,९७६ |
| इतर | ९४१ | ३०७ | ११ | १३ | ६७० |
| एकूण | २३०७५ | १३७१५ | ३२७१४ | ७१२३ | २४८,५५५ |

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे-वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.


या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# औंध स्टेट बँकिंग अँण्ड इन्शुअरन्स कं. लि.

## नवीन इमारतीचें उद्घाटन



कंपनीच्या स्वतःच्या नवीन इमारतीचें उद्घाटन ता. १० मार्च, १९४० रोजीं औंधच्या राजेसाहेबांचे हस्तें झालें.

कंपनीच्या विमाखात्याचे मॅनेजर



श्री. व्ही. जी. जोशी

कंपनीचे जनरल मॅनेजर



श्री. बी. आर. कर्तीक

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% कन्व्हर्शन लोन (१९४५-५५) ... ... | ११२-६ |
| ५% (१९४०-४३) लोन ... ... ... | १०१-११ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६-२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४-४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०४-६ |
| ३% (१९६३-६५) ... ... ... | ९३-० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७-१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | १०६-० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०५-० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) ... .. | ११०-० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२०-० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% ... ... | १४०-० |
| बँक ऑफ बडोदा (१००-५०) १०% ... ... | ९९-० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०-२५) ४% ... | ३७-४ |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १५१२-८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३-० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १०९-१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १३०-० |
| कराची (१००) ९% ... ... ... | १९१-४ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १८२-८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १३५२-८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५५२-८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४¾% ... ... | ९५-८ |
| पाचोरा-जामनेर (१००) २% ... ... | ७२-० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९५५-० |
| तापी व्हॅली (५००) ७½% ... ... ... | ७५७-८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | २१५-० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ४४-१२ |
| शिंद्या स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १८-४ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ... | ३८-१० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४३५०-० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०१-० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. ... | १४५-० |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३८३-० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पे ... | २०४५-० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु ... | ११९-८ |




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अशुअरन्स कं. लि.
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय
हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०
हेड ऑफिस : जळगांव (पू.खा.)
मुंबई शाखा : को-ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.
हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**
**Last year 1937-38**
**Exceeds**
**Rs. 3 CRORES**

**BONUS**
PER THOUSAND PER YEAR
**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध"या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी, यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०-६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ र्‍या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत विकार होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होणें दुखणें, शोषणास ताक न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

दी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
१५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.